लोकमत

# मुकुल माधव विद्यालयाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेत येथील मुकुल माधव विद्यालयाच्या २६पैकी १९ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करताना विशेष श्रेणी मिळवली आहे. अन्य विद्यार्थ्यांनाही ६४ ते ७३ टक्के यादरम्यान गुण मिळाले आहेत. मुकुल माधव विद्यालयाची दहावीची ही पहिलीच तुकडी आहे.

विद्यालयाची पहिलीच दहावीची तुकडी असल्याने निकालाची उत्सुकता होती. विद्यार्थ्यांच्या यशानंतर आनंद व्यक्त केला. मुकुल माधव विद्यालयाकडून यावर्षीच्या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२०-२१) विज्ञान आणि वाणिज्य या दोन शाखांसह कनिष्ठ महाविद्यालय सुरु केले जाणार आहे. दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयामध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी केले आहे.